ये.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-वि (वाय) ३५६

FORM - 1A | N.C.R.B. | I.I.F.-1

0617

# पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT
फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station लाप्राव पहिली खबर क्र. FIR No. २५/१८ वर्ष Year २०१८ दिनांक Date ०५/०७/१८

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलमे Sections ७, १२ (१) (ड) सह १३ (२)
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार Occurence of offence : Day ............ तारीख पासून Date from ०४/०७/१८ वेळ Time १७.३० तारीख पर्यंत Date to ५/०७/१८ वेळ Time १३.१७

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
3. (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date ०२/०७/१८ वेळ Time ०९.५५ वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. २६/१८ तारीख Date ५/०७/१८ वेळ Time १४.५५ वा.

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............ चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ............
   Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. ............ Chouki/Beat/O.P. Name and No. ............
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name सह जिल्हा निबंधक वर्ग २, अभिलेख विभाग, मुंबई उपनगर — No. if any — Ward — Name of road
   जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place बांद्रा गाव Village — पोस्ट Post — तालुका Taluka — जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station — तालुका Taluka — जिल्हा Dist. — राज्य State —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address
   (a) नाव Name श्री. मंगेश सावंत (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name श्री. दादाभाई सावंत
   (c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age ४३ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९९६९३०४१५२
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. — दिल्याचा दिनांक Date of Issue — दिल्याचे ठिकाण Place of Issue — (f) व्यवसाय Occupation स्टॅम्पड्युटी व रजिस्ट्रेशन लायझनर
   (g) धर्म Religion ............ जात Caste ............ जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता : गल्ली/सेक्टर नं. Address : Ward मोतीलाल नगर क्र. १, २०१/१६०० घर/नाव/नंबर House/Name No. ............ फोन/मो. नंबर Phone/M. No. ............ गोरेगाव (पश्चिम) पॅन नं. Pan No. ............ ओटर्स नं. Card No. ............
   रस्त्याचे नाव Road — जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place — गाव Village — पोस्ट Post — पो.स्टे P. Stn. —
   तालुका Taluka — जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address —

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख़. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

   श्रीमती सुनंदा चिंतामण मोरे वय ५२ वर्षे, धंदा - नोकरी, सह दुय्यम निबंधक वर्ग - २, रा. ठी. सर्वे नं. ६७ हंसा रेसिडेन्सी समोर, गोकुळ नगर, धानोरी

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ नाहीकाळ
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties).

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ —
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर जोडावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपीत लोकसेविका श्रीमती सुनंदा चिंतामणी मोरे, सह. दुय्यम निबंधक, वर्ग-२ यांनी फिर्यादी यांचे आशिलाच्या प्लॉट नं. ११/१२ न्यु प्लॉट नं.-१८, सर्वे नं. ५५-१, पार्ट-५e-२ पार्ट अनुक्रमांक २४८/१९७३ या प्रॉप्रटी संदर्भात इन्डेक्सची प्रत देणे हे त्यांचे पदाचे काम असतानाही सदरचे काम करण्यासाठी फिर्यादी यांच्याकडे कायदेशीर परिश्रमाखेरिज पारितोषण म्हणून स्वतःसाठी रू. ५०००/- लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रु. २०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन ती स्विकारली म्हणून त्यांचे विरुद्द कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) भ्र.प्र.का १९८८ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :— 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ........ श्री. मनोज गुजर, पोलीस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ........

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन लाप्रवि ........ जिल्हा मुंबई ........ राज्य महाराष्ट्र

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P. S. ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name ........
पदनाम Rank ........ मनोज गुजर
तपासिक अं. चा पोलीस निरीक्षक
Posting लाप्रवि मुंबई.
Coding No. of I. O. ........

15. १. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

यातील फिर्यादी श्री मंगेश दादाभाई सावंत, वय ४३ वर्षे धंदा- स्टॅम्पड्युटी व रजिस्ट्रेशन लायझनर, रा. ठी. २०१/१६५०, मोतीलाल नगर नं. १, गोरेगाव (पश्चिम) मुंबई ४००१०४ यांचा स्वतंत्र कागदावर मराठीत टंकलिखीत केलेला जबाब हा गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(मनोज गुजर)
पोलीस निरीक्षक,
लाप्रावि मुंबई.

फिर्यादी जबाब दिनांक ०५/०७/२०१८

श्री. मंगेश दादाभाई सावंत, वय ४३ वर्षे, व्यवसाय – स्टॅम्प डयुटी रजिस्ट्रेशन लायझनर, रा.ठि. २०१/१६०७, मोतीलाल नगर नं.१, गोरेगाव पश्चिम, मुंबई ४०० १०४, मो.नं. ९९६९३०४१७२.

०००

मी वरील प्रमाणे असून, मी माझ्या बहीणीकडे वर नमुद पत्त्यावर माझ्या कुटुंबासह राहतो. मी गेले १४ वर्षापासून वैयक्तीकरित्या स्टॅम्प डयुटी रजिस्ट्रेशनच्या लायझनींगचे काम करीत आहे. मी सध्या माझे ओळखीचे श्री. संजय बाफना, (सेवानिवृत्त–नगर भुमापन कर्मचारी) यांचेकडे नाटकवाला लेन, बोरीवली पश्चिम, या ठिकाणी स्टॅम्प डयुटी रजिस्ट्रेशनचे लायझनींगचे काम करतो.

दिनांक १४/०६/२०१८ रोजी श्री संजय बाफना यांनी मला प्लॉट नं ११/१२, न्यू प्लॉट नं १८, सर्वे नं ५५/१,पार्ट ५९/२ पार्ट अनुक्रमांक २४८/१९७३ रजि दिनांक १६/०९/१९९१ या प्रॉर्पटीच्या संदर्भातील इन्डेक्स २ ची प्रत म्हाडा मुख्यालय, बांद्रा येथील निबंधक कार्यालयातून प्राप्त करुन, देण्याचे काम दिले होते. त्याबाबतच ॲथॉरीटी पत्र त्यांनी मला दिलेले होते. त्यानुसार मी दिनांक १५/०६/२०१८ रोजी म्हाडा मुख्यालय, बांद्रा येथे तळमजल्यावर असलेल्या सह जिल्हा निबंधक,वर्ग २, अभिलेख विभाग, मुंबई उपनगर येथे रितसर अर्ज देण्याकरीता त्या कार्यालयातील श्रीमती मोरे मॅडम, (दुय्यम निबंधक अधिकारी) यांना भेटलो व वरील कामासंदर्भात माझा विनंती अर्ज दाखल करुन घेण्याची विनंती केली. श्रीमती. मोरे यांनी माझा अर्ज दाखल करुन घेतला. परंतू सदरचे काम करण्याकरीता माझ्याकडे रु. ५०००/– ची मागणी केली. मी त्यांना कायदेशिर रक्कम जी काही होईल ते भरण्यास तयार असल्याचे सांगुन, त्यांच्या मागणी ऐवढे माझे पैसे देण्याची ऐपत नसल्याचे सांगीतले असता, त्यांनी पैसे दिल्याशिवाय काम होणार नाही असे मला सांगीतले. त्यानंतर मी वारंवार सदर कार्यालयात गेलो परंतू माझ्या अर्जावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. माझ्या अर्जावर कार्यवाही होत नसल्याने मी माझा दाखल केलेला विनंती अर्ज दिनांक २९/०६/२०१८ रोजी परत घेतला.

माझ्याकडे श्रीमती मोरे यांना कायदेशिर असलेल्या शुल्कापेक्षा जास्त रक्कमेची मागणी कल्याने व ती रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी याबाबत दिनांक ०२/०७/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे श्रीमती मोरे यांचेवर कारवाई व्हावी याबाबतचा माझा लेखी विनंती अर्ज घेवून आलो असता, तेथे पोलीस निरीक्षक श्री. गुजर साहेब यांचेकडे विनंती अर्ज दिला असता, पो.नि. गुजर यांनी माझेकडे सविस्तर चौकशी केली.

पो.नि. गुजर यांनी मला, मी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दोन शासकिय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन, पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरच सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येईल असे सांगितले.

त्यानंतर पोनि गुजर यांच्या सुचनेप्रमाणे व ठरल्याप्रमाणे पो.नि. गुजर, स.पो.आ वाव्हळ, पो.शि. मठपती व दोन पंचांसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी कार्यालयातून १२.०५ वा. खाजगी वाहन क्र. एम.एच. ०१ ए.एच ७८४३ या वाहनाने निघून म्हाडा मुख्यालय बांद्रा येथील कार्यालयाचे जवळपास १२.२० वा. आलो. तेथे माझ्या शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन पडताळणी करण्याकरीता मला पंच क्र १ श्रीमती सान्वी मोरे यांचेसह लोकसेवकाची भेट घेण्याकरीता पाठविले. त्याप्रमाणे मी म्हाडा मुख्यालयाच्या इमारतीमधील तळमजल्यावर असलेल्या दुय्यम निबंधक अभिलेख कार्यालयातील कक्षामध्ये आलो असता, तेथे लोकसेवक श्रीमती मोरे या कार्यालयात उपस्थित नव्हत्या म्हणुन मी सदर कार्यालयातील शिपाई श्री. मारूती यांच्याकडून श्रीमती मोरे यांचा मोबाईल नंबर घेवुन कार्यालयाचे बाहेर येवून, माझ्या मो.क्र ९९६९३०४१७२ वरुन श्रीमती मोरे यांच्या मो. क्र. ८२०८१२४१६८ या मोबाईलवर संपर्क साधला असता, श्रीमती मोरे यांनी त्या कोर्टात असल्याचे सांगीतले व मला नंतर फोन करतील असे सांगीतल्याने मी परत आलो व घडलेली हकीकत पो.नि. गुजर यांना सांगितली. त्यानंतर सापळा कारवाई होणार नसल्याने आम्ही दोन पंचांसह लाप्रवि कार्यालयात १४.०० वाजता परत आलो.

त्यानंतर दिनांक ०३/०७/२०१८ रोजी मुंबई शहरामध्ये अतिवृष्टी झाल्याने व अंधेरी येथे पादचारी ब्रिज कोसळल्याने मी त्या दिवशी ला.प्र.विभाग कार्यालयात येवू शकलो नाही व त्यामुळे त्यादिवशी पडताळणीची पुढील कार्यवाही करता आली नाही.

त्यानंतर मी दिनांक ०४/०७/२०१८ रोजी ला.प्र.विभाग कार्यालयात हजर होवून पो.नि.गुजर यांना भेटलो असता पो.नि.गुजर यांनी आज रोजी लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले व त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही झाल्यानंतर पो.नि. गुजर, स.पो.आ ठाकरे, पो.शि. मठपती व दोन पंचांसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी कार्यालयातून १४.३० वाजता खाजगी वाहन क्र. एम.एच. ०१ एएच ७८४३ मधुन म्हाडा मुख्यालय बांद्रा येथील कार्यालयाचे जवळपास १४.५० वा. आलो.

त्यानंतर पो.नि. गुजर यांच्या सुचनेनुसार माझ्या शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावुन पडताळणी करण्याकरीता १५.०३ वा. मला पंच क्र १ श्रीमती सान्वी मोरे यांचेसह लोकसेवकाची भेट घेण्याकरीता पाठविले. त्याप्रमाणे मी म्हाडा मुख्यालयाच्या इमारतीत तळमजल्यावर असलेल्या दुय्यम निबंधक अभिलेख कार्यालयातील कक्षामध्ये लोकसेवक श्रीमती मोरे यांना भेटण्यापुर्वी प्रथम अभिलेख कक्षाच्या लिपीक यांच्याकडे जावून इंडेक्स—२ करीता नियमाप्रमाणे रू. ५/— ची रक्कम भरली व त्याबाबतची पावती घेवून मी श्रीमती मोरे यांच्या कक्षात गेलो त्यांना कागदपत्रांबाबत शासकिय शुल्क भरल्याचे सांगितले व त्यांच्याकडे माझ्या कामाबाबत विचारणा केली असता, त्यांनी कागदपत्रे तयार असल्याचे सांगून रू. २,०००/— दिल्यास सदर कागदपत्रांवर स्वाक्षरी करून कागदपत्रे देईन असे सांगितले. तेव्हा मी माझ्याकडे इतके पैसे नसल्याचे श्रीमती मोरे यांना सांगितले. तसेच पैशाची व्यवस्था केल्यानंतर मी परत येतो असे सांगून मी व पंच सुमारे १७.३९ वा. पो.नि.गुजर यांच्या खाजगी वाहनाकडे परत आलो. पडताळणी प्रक्रियेमध्ये लोकसेवक श्रीमती मोरे यांनी लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने तसेच दि.०४.०७.२०१८ रोजी कार्यालयीन कामकाजाची वेळ संपत आल्याने पुढील कार्यवाही तात्काळ करणे शक्य नसल्याने,

**खरी नक्कल**

समक्ष



पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(मनोज वि. गुजर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

दिनांक ०५/०७/२०१८ रोजी प्रत्यक्ष सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगून, पो.नि. गुजर यांनी सर्व पथकाला आज दि. ०५.०७.२०१८ रोजी वेळेत हजर राहण्याच्या सुचना दिल्या व आम्ही सर्व लाप्रवि कार्यालयात १८.३० वा. परत आलो.

दिनांक ०५/०७/२०१८ रोजी पो.नि. गुजर यांच्या सुचनेप्रमाणे सापळा कारवाईची पुर्व तयारी केल्यानंतर पो.नि. गुजर, स.पो.आ ठाकरे, पो.शि. मठपती व दोन पंचांसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी कार्यालयातून ११.४५ वा. खाजगी वाहन क्र. एम.एच. ०१ एएच ७८४३ या व इतर पोलीस पथक दोन शासकिय वाहनाने निघून म्हाडा मुख्यालय बांद्रा पुर्व मुंबई पासून थोड्या अंतरावर असलेल्या एम.आय.जी क्लब येथे येवून थांबलो. तेथे पो.नि. गुजर यांनी सापळा कारवाईचे आयोजन करुन मला, सापळा पथक व पंचास सापळा कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. गुजर यांनी मला पंच क्र १ श्रीमती सान्वी मोरे यांचेसह प्रत्यक्ष जावुन लोकसेवक श्रीमती मोरे यांना भेटावयास सांगितले. त्यानंतर रुपये २,०००/— इतकी रक्कम लाच म्हणुन वापरण्यात येणार असल्याने मी माझ्या बचतीमधील रु. ५०० रक्कमेच्या ०४ चलनी नोटा पो.नि. गुजर यांना दिल्या. सदर नोटांची छायांकित प्रत पोलीस निरीक्षक गुजर यांनी एम.आय.जी क्लब या ठिकाणी असलेल्या एका झेरॉक्सच्या दुकानात जावून काढल्या. छायांकित प्रतीत घेण्यात आलेल्या नोटा व मी लाच म्हणून दिलेल्या नोटांचे नंबर एकच असल्याची पंचांनी खात्री केली त्या छायांकित प्रतीवर पंचाच्या सहया घेण्यात आल्या.

त्यानंतर लोकसेवक श्रीमती मोरे यांनी लाचेची रक्कम स्विकारली तर फिर्यादीने कार्यालयाच्या बाहेर येवून पॅन्टच्या डाव्या खिशातील रूमाल काढून तो वारंवार डोके पुसण्याची खूण करणे असा इशारा ठरविण्यात आला.

त्यानंतर पो.नि. गुजर यांच्या सुचनेवरून पो.ना.क्र.९७०८६८/भोसले यांनी मला व पंचाना त्यांचे ताब्यात असलेल्या शासकिय वाहनात बसून अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले व त्याचे प्रात्यक्षिक देखील करुन दाखविले. त्यानंतर पंचांसमक्ष मी दिलेल्या रुपये २,०००/— किमतीच्या (रू.५००/— च्या ०४) चलनी नोटांना पो.ना.क्र.९७०८६८/भोसले यांनी अॅन्थ्रासिन पावडर लावली व सदर रक्कम पो.ना. भोसले यांनी मी परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या खिश्यात ठेवली. सापळा कारवाईच्या पुढील कारवाईत पो.ना. भोसले हे भाग घेणार नसल्याचे सांगीतल्याने पो. ना भोसले हे तेथून निघुन गेले. त्यानंतर पो.नि. गुजर यांच्या सुचनेप्रमाणे सापळा कारवाईकरीता पो.शि.मठपती यांनी पुन:श्च माझ्या शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून लावला. त्यानंतर मी पंच क्र १ श्रीमती सान्वी मोरे यांचेसह सह दुय्यम निबंधक श्रीमती मोरे यांची भेट घेण्याकरीता १२.२७ वा. म्हाडा मुख्यालय, बांद्राच्या दिशेने निघालो. माझ्या मागोमाग सापळा पथकातील महिला पोलीस अंमलदार, पो.नि.गुजर व स.पो.आ. ठाकरे पंच क्र २ श्री.पाटील व त्यांचे सोबत पोलीस पथक असे कोणासही संशय येणार नाही अशा स्थितीत म्हाडा मुख्यालय कार्यालयाच्या तळमजल्यावरील सह दुय्यम निबंधक कार्यालयाजवळ पोहोचलो.

त्यानंतर मी लोकसेवक श्रीमती मोरे यांचे कक्षात गेलो व पंच श्रीमती सान्वी मोरे या कक्षाबाहेर थांबल्या. मी लोकसेवक श्रीमती मोरे यांना माझ्या कागदपत्राबाबत

विचारणा केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली व तेथील कर्मचारी श्री.तांबे यांना कागदपत्रे शोधण्यास सांगितले व मला थोडा वेळ बाहेर थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच श्रीमती सान्वी मोरे असे लोकसेवक श्रीमती मोरे यांचे कक्षाबाहेर थांबलो. थोडयावेळाने मी पुन्हा लोकसेवक श्रीमती मोरे यांच्या कक्षात गेल्यानंतर लोकसेवक श्रीमती मोरे यांनी माझी कागदपत्रे तयार असल्याचे सांगुन माझ्याकडे लाचेच्या रकमेची मागणी केली. त्यावेळी मी माझ्या उजव्या हाताने माझ्या शर्टच्या डाव्या खिशातील लाचेची रक्कम काढुन लोकसेवक श्रीमती मोरे यांच्याकडे देत असताना त्यांनी किती रक्कम आणली? याची विचारणा केली असता, मी रू. २,०००/— अशी ठरलेली रक्कम आणल्याचे सांगितल्यावर त्यांनी माझ्याकडे रू. ५,०००/— ची मागणी केली. त्यावेळी मी इतकी रक्कम आणली नसल्याचे त्यांना सांगीतले. तसेच काल दिनांक ०४/०७/२०१८ रोजी श्रीमती मोरे यांनी माझ्याकडे रू.२,०००/— ची मागणी केली असल्याने ती मी देण्याचे कबुल असल्याचे सांगीतल्यावर लोकसेवक श्रीमती मोरे यांनी इंडेक्स—२ कागदपत्रांवर स्वत:ची स्वाक्षरी केली व मी पुढे केलेली लाचेची रक्कम रू. २,०००/— स्विकारली व मी दिलेल्या लाचेच्या रक्कमेची घडी करून सदरची रक्कम त्यांच्या डाव्या बाजुला असलेल्या हिरव्या रंगाच्या लोखंडी कपाटाचा दरवाजा अर्धवट उघडून त्यातील हॅण्ड बॅगमध्ये ठेवल्याचे मी पाहिले. त्यानंतर मी माझी कागदपत्रे घेवून लोकसेवक श्रीमती मोरे यांचे कार्यालयाबाहेर आलो व मला ठरवून दिलेल्या इशाऱ्याप्रमाणे माझ्या पॅटच्या डाव्या खिश्यातील रूमाल डाव्या हाताने काढून तो माझे केसांवरून वारंवार पुसण्याचा इशारा केला. त्यावेळी सापळा पथकातील महिला पोलीस अंमलदार अडसुळे व जाधव यांनी तात्काळ हालचाल करून लोकसेवक श्रीमती मोरे यांच्या कक्षात प्रवेश केला व लागलीच लोकसेवक श्रीमती मोरे यांचा डावा हात महिला पोलीस अंमलदार जाधव व उजवा हात महिला पोलीस अंमलदार अडसुळे यांनी मनगटाजवळ पकडून लोकसेवक श्रीमती मोरे यांना जागीच अटकाव केला. त्याचवेळी स.पो.आ. ठाकरे, पो.नि. गुजर यांनी लोकसेवक श्रीमती मोरे यांच्या कक्षात प्रवेश करून, माझ्या बनियनला लावलेला व्हाईस रेकॉर्डर पो.नि. गुजर यांनी काढून तो बंद करुन आपले ताब्यात घेतला त्यानंतर सपोआ ठाकरे व पो.नि. गुजर यांनी लोकसेवक श्रीमती मोरे यांना आपली ओळख करून दिली. पो.नि. गुजर यांनी पंचांसमक्ष लोकसेवक श्रीमती मोरे यांच्याकडे लाचेच्या रक्कमेबाबत चौकशी केली असता, त्यांनी नमुद रक्कम त्यांच्या डाव्याबाजुस असलेल्या लोखंडी कपाटात हॅण्डबॅगमध्ये ठेवली असल्याचे सांगितले. पो.नि. गुजर यांच्या सुचनेनुसार पंच श्रीमती मोरे यांनी लोखंडी कपाट उघडून त्यातील लाल रंगांची हॅण्डबॅग काढून ती लोकसेवक यांच्या टेबलावर ठेवली. पो.नि. गुजर यांच्या सुचनेप्रमाणे पंच क्र १ श्रीमती सान्वी मोरे यांनी नमुद हॅण्डबॅगची तपासणी केली असता, लाल रंगाच्या हॅण्डबॅगेच्या समोरील डाव्या हाताच्या चेन असलेल्या पॉकेटमध्ये लाचेची रक्कम रू.२,०००/— (भारतीय चलनाच्या रू. ५००/— दराच्या ०४ नोटा ) मिळून आली. सदरची रक्कम पो.नि. गुजर यांच्या सुचनेनुसार पंच क्र १ श्रीमती सान्वी मोरे यांनी स्वत:च्या ताब्यात घेतली.

त्यानंतर पो.नि. गुजर यांच्या सुचनेनुसार माझ्या व लोकसेवक श्रीमती मोरे यांच्या कपडयाची व हाताची कृत्रीम काळोखात अल्ट्राव्हाईलेट दिव्याच्या प्रकाशात पंचासमक्ष तपासणी केली असता लोकसेवकाचे उजव्या हातास तसेच त्यांच्या नेसणीच्या साडीवर ठिकठिकाणी व लाचेची रक्कम ठेवलेल्या हॅण्डबॅगेवर तसेच माझ्या



खरी नक्कल
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

समक्ष
(मनोज वि. गुजर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

उजव्या हाताचे तळहातावर व माझ्या शर्टाच्या डाव्या खिशावर ॲन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसून आली.

लोकसेवक श्रीमती सुनंदा चिंतामण मोरे, सह दुय्यम निबंधक वर्ग—२, सह जिल्हा निबंधक वर्ग—१, अभिलेख विभाग, मुंबई उपनगर, बांद्रा मुंबई यांच्याशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्या—घेण्याचे व्यवहार नाहीत. लोकसेवक श्रीमती सुनंदा मोरे यांना देण्याकरीता आणलेली लाचेची रक्कम ही मी माझ्या बचतीतुन आणलेली आहे.

तरी लोकसेवक श्रीमती सुनंदा मोरे यांनी मला प्लॉट नं ११/१२,न्यू प्लॉट नं १८, सर्वे नं ५५/१,पार्ट ५९/२ पार्ट अनुक्रमांक २४८/१९७३ रजि दिनांक १६/०९/१९९१ या प्रॉप्र्टीच्या संदर्भातील इंन्डेक्स २ ची प्रत देण्याकरीता माझ्याकडे रू.२,०००/— ची लाचेची मागणी केली होती व सदरची रक्कम स्विकारण्याचे कबुल करुन ती रक्कम आज रोजी त्यांचे कार्यालयात स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरोधात कायदेशीर फिर्याद असुन कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलेखीत करुन तो मी वाचुन पाहीला असता तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( मनोज गुजर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.